महाराष्ट्र शासन

क्र. नाविदं २००४/(२२२/०४)/मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २ सप्टेंबर, २००४.

प्रति,
कुलसचिव,
नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

विषय : **कायम विना अनुदान तत्वावर नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत..**

संदर्भ : कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे पत्र क्र.नावि/मवि/११७०/बी/१६७१, दिनांक १२.८.२००४.

महोदय,

आपल्या विद्यापीठामार्फत सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांमध्ये वनवैभव शिक्षण मंडळ, आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली या संस्थेस मौजे सिरोंचा, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली या ठिकाणी विज्ञान विद्याशाखेचे महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव विचारात घेऊन वनवैभव शिक्षण मंडळ, आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली या संस्थेस मौजे सिरोंचा, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली या ठिकाणी सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून विज्ञान विद्याशाखेचे महाविद्यालय सुरु करण्यास कायम विना अनुदान तत्वावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ मधील कलम ८२(५) च्या परंतुक २ नुसार खालील अटींच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर संस्थेने कायम विना अनुदान तत्वावर महाविद्यालय चालविण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र सादर केले नसल्यास सदर हमीपत्र संस्थेकडून घेण्यात यावे. संस्था हमीपत्र देण्यास तयार नसल्यास तसे शासनास कळवावे व शासनाचे आदेश विद्यापीठाने प्राप्त करुन घ्यावेत.

२) सदर महाविद्यालयास दिलेली मान्यता ही **कायम विना अनुदान तत्वावर** असून या महाविद्यालयास भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा आर्थिक मदत शासनाकडून देण्यात येणार नाही.

३) या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक बाबींसंबंधीची सर्वस्वी जबाबदारी स्वीकारणे संस्थेवर बंधनकारक आहे.

(कृपया मागे पहा.)

८) संस्थेने महाविद्यालयासाठी शैक्षणिक संस्था विनियमन प्राधिकरणाकडून शुल्क प्रमाणित करुन घ्यावे.

९) या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ई.बी.सी. सवलत लागू होणार नाही.

२. उक्त महाविद्यालयाने वरील सर्व अटींची पूर्तता केल्यास त्या अधीन महाविद्यालयास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ८२(२) च्या परंतुक २ नुसार संलग्नीकरण देण्याबाबत विद्यापीठाने कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सादर करावा.

आपला,

(अं. अ. कारखानीस)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर.
३) अध्यक्ष सचिव, वनवैभव शिक्षण मंडळ, आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली.
४) मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५) मा. उप मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
६) मा. मंत्री (उच्च शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
७) मा. राज्यमंत्री (उच्च शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
८) निवडनस्ती मशि-३